उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, भंडारा या कार्यालयाच्या इमारत बांधकामाचे अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह (परिवहन)विभाग
शासन निर्णय क्रमांकःपकाबां-०९१७/प्र.क्र.२३०/परि-४

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : १७ एप्रिल २०१८

वाचा :-

१) **परिवहन आयुक्त कार्यालयाचे पत्र क्र. काईबां(३६)/०२१६/न.क्र.०२/का.१०(१)/ जा.क्र.१५४१०,दि.२२.०९.२०१६.**

२) **शासन ज्ञापन क्र.एमव्हीडी-०९१६/प्र.क्र.४६७/परि-४, दि.०३.१०.२०१६.**

३) **मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या दि.१५.०२.२०१८ च्या बैठकीचे इतिवृत्त.**

प्रस्तावना:-

परिवहन आयुक्त कार्यालयाने संदर्भाधीन क्र.१ दि. २२.०९.२०१६ च्या पत्रान्वये उप प्रादेशिक परिवहन कार्यालय भंडारा यांच्या भूमापन क्र. २१२/१ मौजा-पलाडी येथील ४.०० हे.आर. शासकीय जमिनीवर कार्यालयीन इमारत व २५० मी. लांबीचा ब्रेक टेस्ट ट्रॅक बांधण्याकरीता मान्यतेस्तव प्रस्ताव सादर केला होता. सन २०१६-१७ करीता पुरेशी तरतूद नसल्याने आणि मा. न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने प्रथम ब्रेकटेस्ट ट्रॅक उभारण्याच्या खर्चास दि.०३.१०.२०१६ च्या ज्ञापनान्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली होती. आता, उप प्रादेशिक परिवहन कार्यालय भंडारा, कार्यालयाच्या इमारत बांधकामाच्या प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, भंडारा या कार्यालयाच्या भूमापन क्र.२१२/१ मौजा-पलाडी येथील ४.०० हे.आर. शासकीय जमिनीवर कार्यालयीन इमारत बांधकामास रु.७८८.८४ लक्ष इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रकास व नकाशांना दि.१५.०२.२०१८ रोजी मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीत उच्चाधिकार समितीने सहमती दर्शवली आहे. त्यास अनुसरून सदर कामाच्या अंदाजपत्रकाप्रमाणे रु. ७,८८,८४,३४०/- (रुपये सात कोटी अठ्ठाऐंशी लाख चौ-याअंशी हजार तीनशे चाळीस फक्त) इतक्या रक्कमेस शासन या आदेशाव्दारे प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

अंदाजपत्रकाचा तपशील आणि अटी व शर्ती खालीलप्रमाणे.

Name of the Department : HOME DEPTT.			
Name of Work: Construction of Deputy Regional Transport Office building at Paladi Tah. Distt.Bhandara			
RECAPITULATION SHEET			
Sr.No.	Particulars of item	Norms (unit Rate Rs. per Sqmt./Meter/LumpSum etc.)	Cost Rs.
(A)	ESSENTIAL ITEMS		
१	Building proper Scope		
	(a)Area (Sqmt.) ४८४.३०	२३००० Per Sqmt.	१,११,३८,९००
	(b)Number of floors GF		
	(a)Area (Sqmt.) ६५५.४३	२१५००० Per Sqmt.	१,४०,९१,७४५
	(b)Number of floors FF		
	(c)Foundation in B.C./Weak Soil		
	(d)Cost of Construstion		**२,५२,३०,६४५**
२	Electrification Internal	५% of १(d)	१२,६१,५३२
	External	६% of १(d)	१५,१३,८३९
		Total	**२७,७५,३७१**
३	Water Supply and Sanitation	५% - of १ (d)	**१२,६१,५३२**
४	Miscellaneous Items		
	Compound Wall & Gate १०००	७५०० Per Rmt.	७५,००,०००
	Internal Roads CC ५००	८००० Per Rmt.	४०,००,०००
	Furniture ११३९.७३	५००० Per Sqmt.	५६,९८,६५०
	Parking Arrangement	Lump Sum	३०,००,०००
	Rain Water Harvesting	Lump Sum	५,००,०००
	Fire Fighting Arrangements	Lump Sum	१५,००,०००
	Land Development & Gardening	Lump Sum	३०,००,०००
	C.C. Drains १०००	३००० Per Rmt.	३०,००,०००
	C.D.Work ५	२५०००० Per No.	१२,५०,०००
	Soil Investigations	Lump Sum	५,००,०००
		Total	**२,९९,४८,६५०**
	Sub Total (T) = (१)+(२)+(३)+(४)		**५,९२,१६,१९८**
	Contingencies	४% of १(d)	१०,०९,२२६
	GST	१८% of १(T)	१,०६,५८,९१६
	Sub Total (A)		**७,०८,८४,३४०**
(B)	OPTIONAL ITEMS		
Sr.No	Items		
१	Water Main, Storage & pump House, Borewell etc.	Lump Sum	१०,००,०००
२	Air Conditioning	Lump Sum	५,००,०००
३	External toilets	Lump Sum	१०,००,०००
४	Solar Energy System	Lump Sum	५०,००,०००
५	Public Facility Center	Lump Sum	५,००,०००
	Sub Total (B)		**८०,००,०००**
	TOTAL COST OF PROJECTS (A)+(B)		**७,८८,८४,३४०**
	Say Rs. Lakhs		**७८८.८४**

(१) काम सुरू करण्यापूर्वी नमूना नकाशा, मांडणी नकाशा तसेच विस्तृत नकाशास वास्तुविशारदांकडून मंजूरी घेऊनच सुरू करावे.
(२) ढोबळ स्वरुपात धरण्यात आलेल्या तरतूदीबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रक करुनच काम हाती घ्यावे.
(३) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र.इएनव्ही-२०१३/ प्र.क्र.१७७/ तां.क.१,दि. १० जानेवारी, २०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.
(४) सदर कामाच्या बांधकामाचा खर्च विभागाने त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या नियतव्ययामधून करण्यात यावा.
(५) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णय क्र.बीडीजी २०१७/प्र.क्र.६०/इमारती-२,दि.०७.०७.२०१७ अन्वये कार्यवाही करण्यात यावी.

२. यासाठी होणारा खर्च “मागणी क्र.एच-८,मुख्य लेखाशीर्ष ४०५९ सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च (०८) परिवहन (०८)(०१) मोंठी बांधकामे योजनांतर्गत (४०५९ ०८२३)- ५३ मोठी बांधकामे या लेखाशीर्षाखाली मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.”

३. सदर शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.६७४/इमा-२, दि.०३.१०.२०१७ तसेच अनौप-१९१/इमा-१,दि.२४.१०.२०१७ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने तसेच वित्तीय अधिकार नियम पुस्तिका,१९७८ भाग-पहिला, उपविभाग-५, अनुक्रमांक १ महाराष्ट्र सा.बां.नियम पुस्तिकेतील परिच्छेद क्रमांक १३४ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४१७१५३५४१०२२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kadam Dattatray Hanmant

Digitally signed by Kadam Dattatray Hanmant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7fee1bbc15b71aa23bf3ffa4e468df7492703428e9ad65c6cd79299927331e6f, cn=Kadam Dattatray Hanmant
Date: 2018.04.17 15:38:08 +05'30'

(द.ह.कदम)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव
३. मा.राज्यमंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव

४. महालेखापाल (लेखापरिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, ½, मुंबई/नागपूर
५. परिवहन आयुक्त,महाराष्ट्र राज्य
६. जिल्हाधिकारी, भंडारा
७. परिवहन उप आयुक्त (प्रशासन/संगणक/लेखा),परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई
८. अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई
९. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
१०. प्रादेशिक परिवहन अधिकारी, नागपूर
११. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, भंडारा
१२. जिल्हा कोषागार अधिकारी,भंडारा
१३. उप सचिव (इमा) (सार्वजनिक बांधकाम विभाग)
१४. अवर सचिव (बीयुडी-१), गृह विभाग
१५. निवडनस्ती परि-४